पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834.
ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

## प्रेस नोट

दि. 07.01.2022

### आता ड्रोन कॅमेरा उडविणेकरीता घ्यावी लागणार परवानगी अन्यथा करण्यात येईल कायदेशीर कारवाई

सध्याचे युग हे अत्याधुनीक युग असल्याने मोठया प्रमाणात लग्न समारंभ, वाढदिवसाचे कार्यक्रम, सार्वजनिक कार्यक्रम मध्ये ड्रोन कॅमेराचा वापर केला जात आहे. ड्रोन कॅमेरा हाताळताना जिविताचे व मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

❖ ड्रोन नियम 2021 नुसार 2.0 किलो ग्राम च्या वर वजन असलेल्या ड्रोन कॅमेरा करीता खालील अटीचे पालन करणे बंधनकारक आहे.

1. ड्रोन कॅमेरा उडविण्याकरीता परवाना असणे आवश्यक आहे.
2. ड्रोन कॅमेरा उडविण्याकरीता ज्या क्षेत्रात ड्रोन उडविणार आहे त्या क्षेत्रातील पोलीस स्टेशनला माहिती देणे बंधनकारक आहे.
3. ड्रोन चालविण्याकरीता डीजीसीए संस्था, दिल्ली यांची परवानगी असणे आवश्यक आहे.
4. ड्रोन चालविण्याकरीता प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.
5. विमानतळ, शासकिय कार्यालय यांचे इमारत वरुन ड्रोन कॅमेरा उडविण्यास बंदी आहे.
6. ड्रोन कॅमेरा उडवितेवेळी पथकाकडुन तपासणी केल्यास ड्रोन कॅमेरा उडविणा-या व्यक्तीजवळ परवानगी पत्र असणे अनिवार्य राहील.
7. वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत ड्रोन धारक यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

पोलीस निरीक्षक
जिल्हा विशेष शाखा
पोलीस अधिक्षक कार्यालय
वाशिम